३७४३
३/७/१०   ३/८/१०

१७ अ

वे. का. मु.--१,००,०००--(एन) ५६
शा. नि., सा. वि. क्र. २४०८, दि. २२-६-२२;
शा. सं. प. क्र. प्रपत्र/२१६९-अ/२६९, दि. ९-५-६९. ]
शा. प., सा. प्र. वि., क्र. संकीर्ण १०८९/४४४/१८ [ र. व. का. ]
दि. २०-२-८९ अन्वये सुधारित ]

प्रमाण सचि. ७८ म.
Std. Scott. 78 m.

# निर्देश पत्र—अ

विषय :- भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांची बदली व पदस्थापनेबाबत.— श्री. एस.पी. ठाकरे (भावसे)

फाईल क्रमांक AFO-2010/CR/१२६/फ-८

महसूल व वन विभाग

कार्यासन क्रमांक फ-७

संदर्भ :

| दिनांक | कोणाला पाठविले | टीपा व सूचना |
|---|---|---|
| ३/६/१० | G.C.T | |

Page 69

P.S. 158

सोबतचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांचे दि.२९/४/२०१० चे पत्र व सहपत्रे कृपया पहावीत.

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी श्री.एस.पी.ठाकरे, भावसे वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांची बदली करुन या पदावर श्री.व्ही.के.सिन्हा, भावसे प्रादेशिक व्यवस्थापक (मुख्यालय), वनविकास महामंडळ, नागपूर यांची पदस्थापना करण्यात यावी व श्री.ठाकरे यांची पदस्थापना श्री.सिन्हा यांच्या जागी करण्यात यावी असे प्रस्तावित केले आहे. या प्रस्तावाकरिता त्यांनी खालीलप्रमाणे कारणे दिली आहेत :-

चंद्रपूर येथील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प हा देशातील एक अग्रगण्य व्याघ्र प्रकल्प असून, हे क्षेत्र अत्यंत संवेदनशील आहे. या व्याघ्र प्रकल्पाचे व्यवस्थापन कर्तव्य निष्ठ, वरिष्ठ व वन व्यवस्थापनासंबंधी अनुभव असलेल्या अधिका-यांकडे असणे आवश्यक आहे. अलिकडेच या संरक्षित क्षेत्रालगत मानव-वन्य प्राणी संघर्षाची अनेक उदाहरणे उद्भवली असून, त्यामुळे प्रसार माध्यमामध्ये प्रकल्प व्यवस्थापनाच्या विरोधात अनेक बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. तसेच दुर्मिळ होत चाललेल्या व्याघ्र प्रजातीबाबत स्थानिक जनतेमध्ये द्वेष वाढीस लागला आहे.

३. सध्या क्षेत्र संचालकांच्या पदावर कार्यरत असलेल्या श्री.ठाकरे यांच्या कामात वन्यजीव व्यवस्थापनाबाबत संभ्रम असून, त्यांचे काम अत्यंत असमाधानकारक आहे. याबाबत त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करुनही ते याची दखल घेत नाहीत. त्याप्रमाणे इतर प्रशासकीय बाबींमध्ये देखील त्यांचे वर्तन अत्यंत बेजबाबदार असल्याचे मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षकांच्या निदर्शनास आणले आहे.

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी असे कळविले आहे की, सध्या राज्य संवर्गामध्ये वन्यजीव अभ्यासक्रम पदवीधारक अधिका-यांपैकी अपेक्षित वरिष्ठतम असलेला अधिकारी उपलब्ध नाही. श्री.ठाकरे हे सुध्दा वन्यजीव अभ्यासक्रम प्रशिक्षित नाहीत.

५. उपरोक्त बाबी लक्षात घेऊन, श्री.ठाकरे यांची बदलीने पदस्थापना प्रादेशिक व्यवस्थापक (मुख्यालय), वनविकास महामंडळ, नागपूर या पदावर करुन, त्या जागी

श्री.व्ही.के.सिन्हा यांची पदस्थापना करावी असे प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी प्रस्तावित केले आहे.

६. प्रसंगतः नमूद करण्यात येते की, श्री.एस.पी.ठाकरे हे दि.२ सप्टेंबर,२००९ पासून क्षेत्रसंचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर या पदावर कार्यरत असून, श्री.व्ही.के.सिन्हा हे दि.१४ ऑगस्ट,२००८ पासून प्रादेशिक व्यवस्थापक (मुख्यालय), वनविकास महामंडळ, नागपूर या पदावर कार्यरत आहेत.

उपरोक्त पार्श्वभूमीवर उचित कार्यवाहीस्तव आदेशार्थ सादर.

अ.स. १०.५.१०

उपरोक्त प्रस्तावाचा समावेश नियतकालिक बदल्यांच्या प्रस्तावात करण्यात आला आहे.
१.६.२०१०

सहसचिव (श्री.प्रदीप कुमार)

अ.मु.स.(वने)

मा.मुख्य सचिव

8 JUN 2010

मा.मंत्री (वने)

मा.मुख्यमंत्री

महसूल व वन विभाग
नस्ती क्रमांक ..............
10 JUN 2010
कार्यासन ..........
अनुक्रमांक ..........

3/12

<u>**महसूल व वन विभाग**</u>

मागील पृष्ठावरील टिप्पणीस अनुसरुन सादर. मा.मुख्य सचिव यांनी निर्देशित केल्याप्रमाणे चर्चा होऊ शकली नाही.

२. भारतीय वन सेवेतील वनसंरक्षक व उपवनसंरक्षक स्तरावरील अधिका-यांच्या बदल्या मा.मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने दिनांक १३.७.२०१० रोजीच्या आदेशान्वये (पृ.क्र.३५-३८/प.वि.) करण्यात आल्या. या आदेशानुसार श्री.एस.पी.ठाकरे, भा.व.से यांची बदली प्रादेशिक व्यवस्थापक (मुख्यालय), वन विकास महामंडळ, नागपूर या पदावर करण्यात आली आहे व वनसंरक्षक व क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प या पदावर श्री.व्ही.के.सिन्हा यांची पदस्थापना करण्यात आली आहे.

३. श्री.एस.पी.ठाकरे, क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांची झालेली बदली रद्द करण्याविषयी मा.आमदार श्री.सुधीर मुनगुंटीवार यांनी मा.मंत्री (वने) यांना विनंती केलेली आहे. मा.आमदार यांचे पत्र कृपया पृ.क्र.३९/प.वि वर पहावे. मा.मंत्री (वने) यांनी सदर पत्रावर "पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्थगिती" असे आदेशित केले आहे. या प्रकरणी खालील बाबी नमूद करावेसे वाटते.

(अ) चंद्रपूर येथील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प हा देशातील अग्रगण्य व्याघ्र प्रकल्प असून हे क्षेत्र अत्यंत संवेदनशील आहे. या क्षेत्राच्या व्यवस्थापनाबाबतची नॅशनल टाइगर कन्झेर्व्हेशन ॲथॉरिटी व केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालय यांच्याकडूनही देखरेख होत असते. या व्याघ्र प्रकल्पाचे व्यवस्थापन वरिष्ठ व वन्यजीव व्यवस्थापनविषयी अनुभव असलेल्या अधिका-यांकडे असणे आवश्यक आहे. या संरक्षित क्षेत्रालगत मानव वन्यप्राणी संघर्षाची अनेक उदाहरणे उद्भवली आहेत व प्रसार माध्यमामध्ये व्यवस्थापनेच्या विरोधात बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनीही श्री.एस.पी.ठाकरे यांचे काम असमाधानकारक आहे असे नमूद केले आहे. या संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापन वरिष्ठ व वन्यजीव व्यवस्थापनविषयी प्रशिक्षित व अनुभवी अधिका-याकडे असण्याबद्दल नॅशनल टाइगर कन्झेर्व्हेशन ॲथॉरिटी यांनीही निर्देशित केल्याचे निदर्शनास येते.

(ब) भारतीय वन सेवेच्या महाराष्ट्र संवर्गासाठी केंद्र शासनाकडून निर्गमित झालेल्या नवीन संवर्ग पुनर्विलोकनाच्या अधिसूचनेप्रमाणे वनसंरक्षक व क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प या पदाची श्रेणीवाढ व्हावयाची आहे व हे पद मुख्य वनसंरक्षक स्तरावरचे होणार आहे, सदरची कार्यवाही लवकरच होणे अपेक्षित आहे. संवर्ग पुनर्विलोकनाबाबत केंद्र शासनाकडून निर्गमित झालेल्या अधिसूचनेप्रमाणे श्रेणीवाढ होणारे पद, तसेच काही अधिका-यांची पदोन्नती बाबत विचार केल्यास असे दिसून येते की, श्री.एस.पी.ठाकरे यांची मुख्य वनसंरक्षक या पदावर नजीकच्या काळात पदोन्नती शक्य नाही.

(क) श्री.एस.पी.ठाकरे यांची बदली या वर्षाच्या नियतकालिक बदल्यांच्या प्रस्तावासोबत उपरोक्त दोन्ही कारणांवरुन विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आली होती. या प्रस्तावास मा.मंत्री (वने) व मा.मुख्यमंत्री यांची मान्यता मिळाल्यानंतर बदलीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. श्री.एस.पी.ठाकरे, वनसंरक्षक यांच्या बदलीस स्थगितीच्या मुद्यावर मा.अपर मुख्य सचिव (वने) यांनी मा.मंत्री (वने) यांच्याशी चर्चाही केलेली आहे. शिवाय भारतीय वनसेवेतील अधिका-यांच्या बदलीचे आदेश मा.मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने निर्गमित झाले असल्याने स्थगिती देण्यापूर्वी मा.मुख्यमंत्री यांची मान्यता आवश्यक आहे असे वाटते.

४. उपरोक्त पार्श्वभूमीवर मा.आमदार श्री.सुधीर मुनगुंटीवार यांचे पत्र व त्यावर मा.मंत्री (वने) यांनी दिलेले स्थगिती आदेश लक्षात घेता पुढील कार्यवाहीसाठी आदेशार्थ सादर.

प्रदीप कुमार 23.10.2010
(प्रदीप कुमार)
सह सचिव (वने)

३०७
२२/१०

अपर मुख्य सचिव (वने)

7022
/10/10

7/22/2010 Note 2010.tmp

<u>महसूल व वन विभाग.</u>

श्री.ठाकरे यांच्या बदलीला स्थगिती देण्याविषयीच्या मा.मंत्री (वने) यांच्या निदेशांबाबत वरील टिप्पणीच्या तीन मुद्यांशिवाय त्यांच्या निदर्शनास सविनय आणावयाचे आहे की, बदली आदेश काढण्यापूर्वी मा.मंत्री (वने) यांचेशी या विषयावर चर्चा झाली होती आणि त्यावेळी त्यांच्या निदर्शनास आणण्यात आले होते की, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प व्याघ्र भ्रमणमार्गामध्ये (TIGER CORRIDOR) येत असल्यामुळे अति संवेदनशील आहे आणि तेथे होत असलेल्या कामाचा व्यापही मोठा आहे. तसेच तेथे होत असलेल्या कामाबाबत केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाची स्पष्ट देखरेख चालू आहे. श्री.ठाकरे यांचे त्या ठिकाणचे गेल्या आठ महिन्यांतील कामाच्या असमाधानकारक परिणामाबाबत प्रधान मुख्य वन संरक्षक (वनदल प्रमुख) आणि प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्य जीव) यांनी वेळोवेळी शासनास अहवाल दिलेला आहे. तसेच बफर झोनच्या सभेमध्ये स्थानिक पातळीवर ज्या प्रश्नांचे निराकरण करावयास पाहिजे होते, ते श्री.ठाकरे यांनी केलेले नाही, हे त्या सभेत स्पष्ट दिसून आले आणि मा.मंत्री (वने) यांना त्याची स्पष्ट कल्पनाही त्या सभेत झालेली होती. अशा परिस्थितीत, श्री.ठाकरे यांच्या असमाधानकारक कामाला "स्थगिती" देवून संरक्षण करणे योग्य होणार नाही.

वरील परिस्थितीत श्री.ठाकरे यांच्या बदलीला स्थगिती देण्यात येवू नये, असे सविनय निवेदित करावयाचे आहे. इतःपर आदेशार्थ सादर.

( भू.भा.पाण्डेय )
अपर मुख्य सचिव (वने)

मा.मंत्री (वने)

मा.मुख्यमंत्री

**महसूल व वन विभाग**

पूर्वपृष्ठावर मा.मंत्री (वने) यांच्या निर्देशास अनुसरुन सादर.

२. श्री.एस.पी.ठाकरे, भारतीय वन सेवा यांचे काम अत्यंत असमाधानकारक असल्याकारणाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांच्याकडील दिनांक २९.४.२०१० च्या पत्रान्वये श्री.एस.पी.ठाकरे यांची बदली प्रस्तावित केली. (पृ.क्र.१ ते ३/प.वि.) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांचे पत्रासोबत असलेले मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांचेकडील अहवाल तसेच मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर व वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प यांचे दरम्यान झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रतीही प्राप्त झाल्या. हया संदर्भाचे कृपया पृ.क्र.५-३३/प.वि वर अवलोकन व्हावे.

३. श्री.एस.पी.ठाकरे यांच्या बदलीबाबत प्रस्ताव विभागाच्या नियतकालिक बदल्यांच्या प्रस्तावात समाविष्ट होता व यास मा.मंत्री (वने) व मा.मुख्यमंत्री यांची मान्यता मिळाल्यानंतर बदलीचे आदेश निर्गमित करण्यात आले. (पृ.क्र.३५-३८/प.वि.)

४. उपरोक्त प्रकरणी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी आता त्यांच्याकडील पत्र क्र.कक्ष-९/भावसे/बदली/प्र.क्र.५४/१०-११/९०८/१०-११, दिनांक ४.८.२०१० अन्वये (प्रत पृ.क्र.४१-४३/प.वि वर) असे कळविले आहे की, श्री.एस.पी.ठाकरे यांनी दिनांक २.८.२०१० रोजी कार्यभार हस्तांतरणास असमर्थतता दर्शविली. त्यामुळे श्री.व्ही.के.सिन्हा यांनी दिनांक ३.८.२०१० रोजी वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर या पदाचा एकतर्फी कार्यभार ग्रहण केला आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ च्या नियमांचा उल्लेख करुन असे कळविले आहे की, सक्षम प्राधिका-यांनी परवानगी दिली असल्यावरच एकतर्फी कार्यभार स्वीकारता येतो. भारतीय वनसेवा अधिका-यांच्या बदली व पदस्थापनेबाबत सक्षम प्राधिकारी शासन असल्याने कार्यभार हस्तांतरणाबाबत आदेश मिळण्याची विनंती त्यांनी केली आहे.

५. उपरोक्त पार्श्वभूमीवर, त्याअर्थी श्री.एस.पी.ठाकरे यांच्या बदलीचे आदेश निर्गमित झालेले आहेत व त्यांच्या बदलीच्या स्थगितीबाबत आदेश नाहीत; श्री.व्ही.के.सिन्हा यांनी एकतर्फी कार्यभार ग्रहण केला असल्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र

राज्य, नागपूर यांनी कळविले आहे व त्यांनी याबाबत शासनाकडून आदेश अपेक्षिलेले आहेत त्याअर्थी आता श्री.व्ही.के.सिन्हा यांना वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर या पदाचा कार्यभार स्वीकारण्याबाबत शासन मान्यता देणे योग्य राहील असे वाटते.

तथापि आदेशार्थ सादर.

प्रदीपकुमार
५.८.२०१०
(प्रदीप कुमार)
सह सचिव (वने)

बदलीच्या आदेश मा. मु.मंत्री यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात आले आहे. सबब, स्थगिती देणे योग्य होणार नाही. शासनाच्या आदेशाचा अनुपालन न करणे, [illegible] केल्यामुळे [illegible] श्री. ठाकरे यांचे विरुद्ध शिस्तभंग कारवाई करण्यात यावी व आदेशाचा अनुपालन [illegible] होणे आवश्यक. श्री. सिन्हा यांनी कार्यभार स्वीकारावा असे आदेशार्थ सादर.

अपर मुख्य सचिव (वने)

मा.मंत्री (वने)

मा.मुख्यमंत्री

मा. मु.

[illegible]

७४४२
२४१८१०

अ. मु. स. (वने)

प्रदीपकुमार
२५.८.२०१०

अ.स.(फ-८)

R/5/2010Note 2010.tmp

महसूल व वन विभाग/ फ-७

मागील पृष्ठावरील टिप्पणीच्या अनुषंगाने सादर.

वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंदपूर या पदाचा कार्यभार स्वीकारण्याबाबतचा विषय या नस्तीवर विचाराधीन आहे.

याबाबत नमूद करण्यात येते की, श्री. व्ही. के. सिन्हा भावसे यांनी उपरोक्त पदाचा कार्यभार दि. ६/८/२०१० रोजी स्वीकारला आहे. याबाबत कार्यभार हस्तातरण प्रमाण पत्राची प्रत पृष्ठ क्र. ४७ प वर आहे. सबब याप्रकरणी अधिक कार्यवाहीची आवश्यकता वाटत नाही.

श्री. एस.पी. ठाकरे भावसे यांच्या नविन पदस्थापने बाबत शासन आदेश प्राप्त झाले आहे. त्यानुसार निर्गमित करावयाच्या शासन आदेशाचे प्रारुप पृष्ठ क्र. ४९ प. वि सादर केले असून मान्य झाल्यास निर्गमित व्हावे.

आदेशार्थ सादर.

२६.८.१०
अ.स.

उ.स. (~~श्री. प्र.~~)

२७.८.२०१०

अ.मु.स. (वने)

२५३१
३०।८।१०

३१.८.२०१०

फ-८